**स्वर्गीय श्री. बाळासाहेब ठाकरे राष्ट्रीय स्मारक सार्वजनिक न्यासावरील अध्यक्ष व इतर पदांवर नियुक्तीबाबत....**

**महाराष्ट्र शासन**

**सामान्य प्रशासन विभाग,**

**शासन निर्णय क्रमांक :- स्मारक ३११४/मुमंस-१४०/प्र.क्र.३७५/२९**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०००३२.

**दिनांक :- १५ नोव्हेंबर, २०२५**

<u>वाचा</u> :- (१) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. स्मारक३११४/ मुमंस१४०/प्र.क्र.३७५/२९, दिनांक ४ डिसेंबर, २०१४ व दि. २७ सप्टेंबर, २०१६.

(२) श्री. उध्दव ठाकरे, अध्यक्ष, स्वर्गीय श्री. बाळासाहेब ठाकरे राष्ट्रीय स्मारक सार्वजनिक न्यास यांचे दिनांक २५.११.२०१९ चे पत्र.

(३) सदस्य सचिव, स्वर्गीय श्री. बाळासाहेब ठाकरे राष्ट्रीय स्मारक सार्वजनिक न्यास यांचे दिनांक २८.०२.२०२० चे पत्र.

(४) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.स्मारक ३११४/मुमंस-१४०/प्र.क्र.३७५/२९, दिनांक १३ मार्च, २०२०.

(५) सदस्य सचिव, स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे, राष्ट्रीय स्मारक सार्वजनिक न्यास यांचे दिनांक १२ मार्च, २०२५ रोजीचे पत्र.

<u>प्रस्तावना</u> :-

स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मृती जपण्याकरीता मुंबई येथे त्यांचे भव्य स्मारक उभारण्यासाठी शिवाजी पार्क, दादर येथील "महापौर बंगला" या जागेची निवड केली आहे. सदर स्मारकासाठी शासकीय सार्वजनिक न्यास स्थापन करण्यात आला आहे. त्यानुसार दि.२७ सप्टेंबर, २०१६ च्या शासन निर्णयान्वये श्री. उध्दव ठाकरे यांच्या अध्यक्षतेखाली सार्वजनिक न्यास व संस्था स्थापन करण्यात आलेली होती. दि.२५.११.२०१९ च्या पत्रान्वये श्री. उध्दव ठाकरे, अध्यक्ष, स्वर्गीय श्री. बाळासाहेब ठाकरे राष्ट्रीय स्मारक सार्वजनिक न्यास यांनी अध्यक्ष पदाचा राजीनामा दिल्याने तसेच न्यासाच्या विधानपत्र (Memorandum of Association) आणि नियम व नियमावली (Rules And Regulation) मधील अ.क्र. १४ येथील तरतूदीनुसार न्यासावरील अध्यक्ष व इतर सदस्यांचा प्रथम नियुक्तीचा ३ वर्षाचा कालावधी संपुष्टात आल्याने पदसिध्द सदस्य वगळता अध्यक्ष व सदस्यांची पदे भरण्याबाबतचा दिनांक १३ मार्च, २०२० रोजीचा शासन निर्णय निर्गमित करण्यात आलेला होता. पदसिद्ध सदस्य वगळता अध्यक्ष व इतर सदस्यांची न्यासावरील ५ वर्षाची मुदत दि. ११ मार्च, २०२५ रोजी संपल्याने सदर पदे भरण्याबाबतचा प्रस्ताव विचाराधीन होता.

**शासन निर्णय :-**

आता स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे यांचे स्मारक उभारण्याच्या प्रयोजनार्थ स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे राष्ट्रीय स्मारक सार्वजनिक न्यासावरील पदसिद्ध सदस्य वगळता अध्यक्ष व इतर सदस्य पदांवर खालीलप्रमाणे नव्याने नियुक्ती करण्यास याद्वारे मान्यता देण्यात येत आहे.

| अ.क्र. | नाव /पदनाम | न्यासावरील पद |
|---|---|---|
| १ | श्री.उध्दव बाळासाहेब ठाकरे, माजी मुख्यमंत्री तथा विधानपरिषद सदस्य | अध्यक्ष |
| २ | श्री.सुभाष राजाराम देसाई, माजी मंत्री | सचिव |
| ३ | श्री.आदित्य उध्दव ठाकरे, माजी मंत्री तथा विधानसभा सदस्य | सदस्य |
| ४ | श्री. पराग आळवणी, विधानसभा सदस्य | सदस्य |
| ५ | श्री. शिशिर शिंदे, माजी विधानसभा सदस्य | सदस्य |
| ६ | मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन | पदसिध्द सदस्य |
| ७ | प्रधान सचिव (नगर विकास) (नवि-२) | पदसिध्द सदस्य |
| ८ | प्रधान सचिव (विधि व न्याय विभाग) | पदसिध्द सदस्य |
| ९ | आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका | पदसिध्द सदस्य |
| १० | रिक्त (सर्वसाधारण सदस्यांमधून निवडावयाचे) | सदस्य |
| ११ | रिक्त (सर्वसाधारण सदस्यांमधून निवडावयाचे) | सदस्य |

उपरोक्त क्र. १ ते ३ येथील सदस्यांची मुदत ५ वर्ष कालावधीकरीता व क्र. ४ व ५ येथील सदस्यांची मुदत ३ वर्षाकरिता राहील.

उपरोक्त अध्यक्ष व सदस्यांच्या नियुक्तीमुळे झालेल्या बदलाच्या अनुषंगाने सार्वजनिक न्यासाचा व संस्थेचा नोंदणी अर्ज धर्मदाय आयुक्त यांचेकडे दाखल करण्यास श्री. सुभाष राजाराम देसाई, सचिव, शासकीय सार्वजनिक न्यास यांना प्राधिकृत करण्यात येत आहे. त्या अनुषंगाने श्री. सुभाष राजाराम देसाई यांनी "बाळासाहेब ठाकरे राष्ट्रीय स्मारक" या नावाने सार्वजनिक न्यासाची मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम, १९५० व संस्थेची सहकारी संस्था नोंदणी अधिनियम, १९६० अन्वये केलेल्या नोंदणीच्या अनुषंगाने आता झालेल्या अध्यक्ष व इतर पदांवरील झालेल्या बदलाबाबतच्या नोंदणी संदर्भात पुढील आवश्यक ती कार्यवाही करावी.

उपरोक्त नियुक्त करण्यात आलेल्या विश्वस्त मंडळाने न्यासाच्या विधानपत्र (Memorandum of Association) आणि नियम व नियमावली (Rules and Regulations) यातील तरतुदीस अनुसरुन न्यासाचे कामकाज करावे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संकेतांक क्रमांक २०२५१११५२००७२४१२०७ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.**

GOVIND BALAJI SABNE

Digitally signed by GOVIND BALAJI SABNE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=GAD, 2.5.4.20=9FAE8C57BC74385871D5BFB6D5BF3A8B1325732DE12F4E1EB564DCD6E6DCF31F, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=F35CCBA6FB37254B3D3E122E1842F419E20858CE28B6DF89F96E5B5693D0BA7E, cn=GOVIND BALAJI SABNE
Date: 2025.11.17 11:12:38 +05'30'

**( गोविंद साबने )**
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.
२. मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. श्री. उध्दव बाळासाहेब ठाकरे, माजी मुख्यमंत्री तथा विधानपरिषद सदस्य भूखंड क्र.१४, २५ मातोश्री बंगलो, कलानगर, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१.
४. श्री. सुभाष राजाराम देसाई, माजी मंत्री फ्लॅट नं. १, तळमजला, विद्युत सीएसएच, लोकमान्य टिळक नगर, ४ था रोड, महात्मा गांधी रोड, गोरेगांव (पश्चिम), मुंबई-४०० ०६२
५. श्री. आदित्य उध्दव ठाकरे, माजी मंत्री तथा विधानसभा सदस्य, भूखंड क्र. १४, २५ मातोश्री बंगलो, कलानगर, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१.
६. श्री. पराग आळवणी, विधानसभा सदस्य, ९०१, ९ वा मजला, विद्याविहार, हॅपी होम मोमायटी, नेहरु रोड, विलेपार्ले (पूर्व), मुंबई-४०० ०५७.
७. श्री. शिशिर शिंदे, माजी विधानसभा सदस्य, १ गुलमोहर, जी.व्ही. स्किम रोड, क्र.१, मुलुंड (पूर्व), मुंबई-४०० ०८१.
८. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
९. अपर मुख्य सचिव (नवि-१), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०. प्रधान मचिव (नवि-२), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
११. प्रधान सचिव (विधी व न्याय विभाग), मंत्रालय, मुंबई.
१२. विभागीय आयुक्त, कोकण विभाग, कोकण भवन, नवी मुंबई.
१३. आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई.
१४. पोलिस आयुक्त, बृहन्मुंबई.
१५. उप सचिव, कार्यासन-२९, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१६. निवडनम्ती/कार्यासन-२९.